# महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण
## जनसंपर्क विभाग

कक्ष क्र. १९/२० तळ मजला, गृहनिर्माण भवन, कला नगर, वांद्रे पूर्व, मुंबई – ४०००५१.
दू.क्र. ०२२-६६४०५०६६/७७. ईमेल : cpromhadaoffice@gmail.com

म्हाडा MHADA


==================================================================

जावक क्रमांक – ३१४७ / ४७ दिनांक :- २६ ऑगस्ट, २०२४

**प्रसिद्धिपत्रक**

**गृहनिर्माणमंत्री अतुल सावे यांच्या हस्ते २८ ऑगस्ट रोजी म्हाडाच्या शुभंकर चिन्हाचे अनावरण**

मुंबई, दिनांक २६ ऑगस्ट, २०२४: महाराष्ट्र गृहनिर्माण आणि क्षेत्रविकास प्राधिकरण (म्हाडा) , देशातील गृहनिर्मिती क्षेत्रातील अग्रगण्य संस्था, आधुनिक युगाची नवीन आव्हाने स्वीकारत राज्यात आजवर सुमारे नऊ लाख घरांची निर्मिती करणारी लोकाभिमुख संस्था म्हणून सर्वसामान्यांची जिव्हाळ्याची संस्था म्हणून प्रचलित आहे. आधुनिक काळाची आव्हाने पेलत म्हाडाने आजवर आपल्या कार्यप्रणाली वेळोवेळी अद्ययावत केली आहे. त्याचप्रमाणे आधुनिक तंत्रज्ञान युगामध्ये म्हाडाच्या केंद्रस्थानी असलेल्या नागरिकांशी जनसंवाद प्रामुख्याने सुलभ व पारदर्शक राहावा, या उद्देशाने म्हाडातर्फे शुभंकर चिन्ह (Mascot) तयार करण्यात आले आहे. बुधवार दिनांक २८ ऑगस्ट, २०२४ रोजी एका कार्यक्रमांतर्गत या शुभंकर चिन्हाचे अनावरण राज्याचे गृहनिर्माण मंत्री श्री. अतुल सावे यांच्या हस्ते म्हाडा मुख्यालयात करण्यात येणार आहे.

म्हाडा मुख्यालयातील भारतरत्न गुलझारीलाल नंदा सभागृहात आयोजित या कार्यक्रमाला अपर मुख्य सचिव गृहनिर्माण श्रीमती वल्सा नायर- सिंह (भा.प्र.से.), 'म्हाडा'चे उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. संजीव जयस्वाल (भा.प्र.से.) देखील उपस्थित राहणार आहेत . सन १९४९ मध्ये "दि बॉम्बे हाऊसिंग बोर्ड" ते ५ डिसेंबर १९७७ रोजी स्थापन झालेले आजचे महाराष्ट्र गृहनिर्माण आणि क्षेत्र विकास प्राधिकरण (म्हाडा) अशा ७५ वर्षांच्या गृहनिर्मितीतील दैदीप्यमान प्रवासामध्ये राज्यात नऊ लाख कुटुंबीयांना हक्काचा निवारा परवडणाऱ्या दरात उपलब्ध करून दिला आहे.

म्हाडाने नेहमीच बदलत्या काळाशी जुळवून घेत आपल्या कार्यात बदल केले आहेत. आधुनिक तंत्रज्ञानाशी सांगड घालत म्हाडाने लोकाभिमुख सेवा ऑनलाइन करत नागरिकांच्या अनेक अडचणी सोडविल्या आहेत तसेच सदनिकांच्या विक्रीकरिता IHLMS २.० ही अत्यंत पारदर्शक संगणकीय सोडत प्रणाली देखील कार्यान्वित केली आहे. याच लोकसेवेच्या पार्श्वभूमीवर एक पाऊल पुढे टाकत म्हाडाचे नवे शुभंकर चिन्ह (मॅस्कॉट) निर्माण केले आहे. म्हाडा हे एक लोकाभिमुख कार्यालय असल्याने अनेक नागरिक या कार्यालयास भेट देत असतात. म्हाडाच्या कार्यप्रणालीची ओळख व मार्गदर्शन मिळविण्याकरिता नागरिकांना या शुभंकरची मदत होणार आहे.

###

(वैशाली गडपाले)
मुख्य जनसंपर्क अधिकारी / प्राधिकरण

---

**सोशल मिडियावर आम्हाला फॉलो करा :**

X @mhadaofficial Facebook @mhadaofficial Instagram @mhadaofficial YouTube @mhadaofficial

**Maharashtra Housing & Area Development Authority**
Public Relations Department
Room No. 19/20, Ground Floor, Gruhnirman Bhavan, Kala Nagar, Bandra East, Mumbai-400051. Email : cpromhadaoffice@gmail.com

==========================================================================

Outward No. 3147/47 Dt. 26/08/2024

**Press Release**

## Housing Minister Atul Save to Unveil MHADA's Mascot on August 28

Mumbai, August 26, 2024: The Maharashtra Housing and Area Development Authority (MHADA), a leading housing authorioty of the nation, in its efforts to enhance communication and transparency with citizens, MHADA has developed a mascot that symbolizes its commitment to serving the public. This mascot will be officially unveiled by the Honorable Housing Minister, Mr. Atul Save, during a special event at MHADA Headquarters on Wednesday, August 28, 2024.

The event will take place at the Bharat Ratna Gulzarilal Nanda Auditorium, located at MHADA Headquarters at 3.00 pm. Additional Chief Secretary of the Housing Department, Mrs. Valsa Nair-Singh (IAS), and MHADA Vice Chairman and CEO, Mr. Sanjeev Jaiswal (IAS), will also be present on the occasion.

Established in 1949 as the Bombay Housing Board and transformed into the Maharashtra Housing and Area Development Authority (MHADA) on December 5, 1977, the organization has played a vital role in providing affordable housing to nearly nine lakh families over its 75-year journey.

MHADA has continually adapted to changing times, integrating modern technology into its operations to better serve the public. The organization has made its services more accessible by going online and has introduced the IHLMS 2.0, a transparent computerized lottery system for housing allocation. The creation of this mascot represents another step forward in MHADA's mission to engage with the public and assist citizens in navigating its processes more effectively.

###

(Vaishali Gadpale)
Chief Public Relations Officer, MHADA

---

**Follow us on :**

@mhadaofficial @mhadaofficial @mhadaofficial @mhadaofficial

महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण

जनसंपर्क विभाग

कक्ष क्र. १९/२० तळ मजला, गृहनिर्माण भवन, कला नगर, वांद्रे पूर्व, मुंबई – ४०००५१.

दू.क्र. ०२२-६६४०५०६६/७७. ईमेल : cpromhadaoffice@gmail.com


=====================================================================

Outward No. ३१४७/४७ Dt. 26/08/2024

## प्रेस विज्ञप्ती

# २८ अगस्त को गृहनिर्माण मंत्री अतुल सावे करेंगे म्हाडा के शुभंकर का अनावरण

मुंबई, २६ अगस्त २०२४: महाराष्ट्र गृहनिर्माण और क्षेत्र विकास प्राधिकरण (म्हाडा), देश के गृहनिर्माण क्षेत्र में एक प्रमुख संस्था है। म्हाडा ने अब तक राज्य में लगभग ९ लाख घर बनाए हैं और हमेशा बदलते समय की चुनौतियों को अपनाया है। लोगों से सीधे और पारदर्शी तरीके से जुड़ने के लिए म्हाडा ने एक शुभंकर (मास्कॉट) तैयार किया है। इस शुभंकर का अनावरण २८ अगस्त २०२४ को म्हाडा मुख्यालय में गृहनिर्माण मंत्री श्री अतुल सावे द्वारा किया जाएगा।

यह कार्यक्रम म्हाडा मुख्यालय के भारतरत्न गुलजारीलाल नंदा सभागृह में होगा। इस मौके पर गृहनिर्माण विभाग की अपर मुख्य सचिव श्रीमती वल्सा नायर-सिंह (आईएएस) और म्हाडा के उपाध्यक्ष और मुख्य कार्यकारी अधिकारी श्री संजीव जयस्वाल (आईएएस) भी मौजूद रहेंगे।

म्हाडा की स्थापना १९४९ में "बॉम्बे हाउसिंग बोर्ड" के रूप में हुई थी और ५ दिसंबर १९७७ को इसे महाराष्ट्र गृहनिर्माण और क्षेत्र विकास प्राधिकरण (म्हाडा) का नाम मिला। पिछले ७५ सालों में म्हाडा ने करीब ९ लाख परिवारों को किफायती घर उपलब्ध कराए हैं।

म्हाडा ने हमेशा समय के साथ अपने काम में सुधार किया है। आधुनिक तकनीक का उपयोग करते हुए म्हाडा ने अपनी सेवाएं ऑनलाइन की हैं और IHLMS २.० जैसी पारदर्शी लॉटरी प्रणाली भी शुरू की है। इसी सेवा को आगे बढ़ाते हुए म्हाडा ने यह शुभंकर तैयार किया है, जो लोगों को म्हाडा के काम को समझने और मदद लेने में सहायक होगा।

###

(वैशाली गडपाले)
मुख्य जनसंपर्क अधिकारी / प्राधिकरण

---

Follow us on :

@mhadaofficial @mhadaofficial @mhadaofficial @mhadaofficial